**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
'A' Re-accrediated by NAAC

शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/२९९३ दिनांक ०३-१०-२०१५

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
(अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र, शिक्षणशास्त्र महाविद्यालये वगळून)

विषय :- ऑक्टोबर २०१५ चा निकाल अचूक व निर्दोष लागण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना.

महोदय,

आपणास विदीत आहेच की, ऑक्टो/नोव्हें, २०१५ (हिवाळी परीक्षांचे) नियोजन झाले असून बी.ए. /बी.कॉम/बी.एस्सी इत्यादी परीक्षांचे अर्ज संगणकीय प्रणालीमधूनच भरले जावेत याकरीता संपूर्ण प्रयत्न सर्व स्तरांवर करणेत आले आहेत. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संगणकीय प्रणालीतूनच भरले जावेत याकरीता विद्यापीठामध्ये महाविद्यालयनिहाय शिबीराचे आयोजन दि. १८ ते ३० सप्टेंबर २०१५ मध्ये करण्यात आले होते. यामध्ये सर्व परीक्षा अर्ज भरणेबाबतची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तथापी काही विद्यार्थ्यांच्या बाबतीमध्ये निकालामधील त्रुटी किंवा अन्य अपूर्ण बाबी यामुळे ऑक्टो/नोव्हें २०१५ च्या निकालामध्ये काहीही अपूर्णता राहू नये व संपूर्ण निकाल निर्दोष असावेत यादृष्टीने खालीलप्रमाणे उपायोजना करणे अपेक्षित आहे.

१. ज्या विद्यार्थ्यांनी /महाविद्यालयांनी पूर्वी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत तसेच शिबीरामध्ये त्रुटी पूर्ण करुन भरलेले सर्व अर्ज इनवर्ड झाले आहेत का याची खात्री करावी.

२. शिबीरामध्ये त्रुटी पूर्ण झालेल्या आहेत, त्यांचे अर्ज जनरेट झालेले आहेत का तसेच ते इनवर्ड झालेले आहेत का याची खात्री करावी.

३. सर्व फॉर्मला बैठक क्रमांक मिळालेत का याची खात्री करावी.

४. सर्व विद्यार्थ्यांचे हॉलतिकीट जनरेट झालेत का ? जनरेट झालेले हॉलतिकीट त्यामधील विषय बरोबर आहेत का ? **विद्यार्थ्यांच्या हॉलतिकीट मध्ये काही दुरुस्त्या असल्यास अशा दुरुस्त्या परीक्षे पूर्वी किंवा परीक्षेनंतर ताबडतोब संगणक प्रणालीमध्ये करुन घ्याव्यात. तसे न केल्यास विद्यार्थ्यांचा निकाल चुकीचा जाहिर होतो याची दक्षता घ्यावी.**

५. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल उशिरा जाहिर झालेले आहेत त्यांचा पुढील सेमिस्टरचा परीक्षा अर्ज भरण्यासाठी डाटा एंट्री तात्काळ करावी व परीक्षा अर्ज जनरेट झालेची खात्री करावी.

६. एखादा विद्यार्थी एकापेक्षा जादा सेमिस्टरला बसणार असेल तर त्याचे ते सर्व सेमि.चे फॉर्म इनवर्ड झाले आहेत का? जर झाले नसतील तर ते सर्व सेमि. इनवर्ड करून घ्यावेत व त्याचे हॉल तिकीट तयार झालेत का याची खात्री करावी.

७. सर्व विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकानुसार सर्व प्रकारचे गुण (टर्मवर्क, प्रॅक्टीकल, थेअरी इ.) एन्ट्री झालेत का याची खात्री करावी. सर्व प्रकारचे सर्व विद्यार्थ्यांचे गुण संगणक प्राणालीमधून येतील याची खात्री करावी. मॅन्युअली गुण पाठवू नयेत.

तरी उपरोक्त बाबतीत खात्री करुन ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१५ मध्ये होणा-या सर्व परीक्षेचे निकाल व्यवस्थीत लागतील यासाठी प्रयत्न करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
उप.कुलसचिव

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com